AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
(Peer Reviewed and Indexed Journal)

Special Issue No : 49 Impact Factor : 5.707 ISSN : 2349-638x

# International Conference

On

## *"Advanced and Innovative Practices in Commerce & Management, Science & Technology, Humanities, Languages and Their Role in Achieving the Exponential Growth"*

*Date* : 16th February 2019

Organised by

Shri Narayanrao Babasaheb Education Society's

## SHRI VENKATESH MAHAVIDYALAYA, ICHALKARANJI

In collaboration with

## SHIVAJI UNIVERSITY COMMERCE AND MANAGEMENT TEACHERS ASSOCIATION (SUCOMATA)

and

## BVDU's INSTITUTE OF MANAGEMENT AND ENTREPRENEURSHIP DEVELOPMENT, (IMED) Pune

Editorial Board

Chairman : Prin. Dr. Vijay Annaso Mane
Editor-in-chief : Dr. Naushad Makbool Mujawar
Co-editor : Mrs. Sunita Hansraj Ambawade

VOLUME

...katechcollege.com

# INDEX



| Sr.No. | Author Name | Title of Research Paper / Article | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | MR. Sanjay Trimbak Gholap | Nuclear Energy Programme in India | 288 to 291 |
| 2 | Dr. Abhay Patil | Vilasrao Patil Undalkar:- A Developmental Era Of South Karad | 292 to 295 |
| 3 | डॉ. सौ. शकुंतला चव्हाण | आदिवासी-ग्राम बालशिक्षण व ताराबाई मोडक : एक ऐतिहासिक आढावा | 296 to 302 |
| 4 | प्रा. डॉ. तानाजी ज्ञानदेव पाटील | धनगर गीतातील समाजजीवन | 303 to 307 |
| 5 | Mr. A.K. Ganbawle | An analysis of E –Commerce In India And Their Present Status and Challenges | 308 to 312 |
| 6 | प्रा.डॉ.एस्.एम.गावडे | भारतीय स्त्री शिक्षणाची स्थिती | 313 to 317 |
| 7 | डॉ. शिवाजी महादेव होडगे | कादंबरीतील बदलत्या ग्रामजीवनाचे चित्रण | 318 to 326 |
| 8 | प्रा. डॉ. विश्वास शं. पाटील | यशवंतराव चव्हाणांच्या भाषणातून व्यक्त होणारा साहित्यिक दृष्टिकोन | 327 to 332 |
| 9 | प्रा. मारुफ मुजावर | भारतीय साहित्य में दलित चेतना | 333 to 337 |
| 10 | प्रा.डॉ.सुगंधा हिंदुराव घरपणकर | बदलते परिदृश्य में हिन्दी भाषा की स्वीकार्यता | 338 to 340 |
| 11 | प्रा.डॉ.आनंद वारके | पी.पी.टी. व लघुपट निर्मिती : मराठी साहित्य घटक अध्यापनासाठी प्रगत, नाविण्यपूर्ण व अभिनव पध्दती | 341 to 345 |
| 12 | डॉ.अर्चना राजकुमार कांबळे (जगतकर) | माध्यमां धील स्त्रिया | 346 to 349 |
| 13 | डॉ.सिंधु जयवंत आवळे | लोकनाथ यशवंत यांच्या कवितेतील समकालीन वास्तव | 350 to 353 |
| 14 | प्रा. डॉ. माधव मारुती भोसले | भाषा रचना आणि मराठी भाषेची स्थिती | 354 to 358 |
| 15 | सौ. मधुरा चिंतामणी पुजारी | धार्मिक पर्यटनाचा मेरूमणी - श्री क्षेत्र नृसिंहवाडी | 359 to 365 |
| 16 | Ms. S.S. Sarmagdum | Effects Of War In Elizabeth Bowen"s 'The Heat Of The Day' | 366 to 369 |
| 17 | Shaifta Ayoub | Kashmiriyat and English Novel In Kashmir: Analyzing Vikram Chandra's *Srinagar Conspiracy* (2000) | 370 to 373 |
| 18 | Mrs. Shailaja Arjun Changundi | The Idea Of Virtual Hell And Afterlife In The Novel 'Surface Detail' by Iain m. Banks | 374 to 377 |
| 19 | Prof. Patil raygonda pungonda | The Diaspora Writers And The Theme Of Cultural Conflicts And Civil Wars In The Multicultural Society | 378 to 382 |
| 20 | Dr. Dinesh d. Satpute | Advanced and Innovative Practices In English In Indian Context | 383 to 386 |
| 21 | Dr. P.M. Patil | Innovative Practices To Be A Good Teacher | 387 to 389 |
| 22 | Latika Subhash Patil | A Study Of The Language Used In The Slogans Of The Advertisements | 390 to 393 |
| 23 | Mrs. Sunita j. Velhal | Recent Trends In English Teaching And Learning | 394 to 396 |
| 24 | Smt Bhargande Sulakshna Kisanrao | Achieving Great Potential In Rapid Reading | 397 to 399 |
| 25 | Dr. Rachana vijay musai | A Journey Towards Muslim Women's Empowerment In 'The Girl In The Tangerine Scarf' | 400 to 401 |
| 26 | Prof. J.K Patil. | English Language Excercises | 402 to 404 |

# लोकनाथ यशवंत यांच्या कवितेतील समकालीन वास्तव

डॉ.सिंधु जयवंत आवळे
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.
ई-मेल : drsindhuawale9@gmail.com

साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असते असे म्हणतात. समाजात जे-जे घडते त्याचे वास्तव दर्शन साहित्यात उमटते. ही समाजात घडलेली सर्व स्थित्यंतरे मराठी साहित्यातही दिसतात. अगदी संत, पंत आणि तंत साहित्य ते कविता, कथात्मसाहित्य (ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, फुले आंबेडकरी साहित्य ते आज वर्तमानातील जागतिकीकरणातले साहित्य असा एक मोठा अवकाश मराठी साहित्याने व्यापला आहे.

यामध्ये दलित साहित्याचा प्रवाह १९६० च्या दरम्यान मराठी साहित्यात प्रवाहित झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव दलित साहित्यिकांच्या सर्वंकष वाङ्मयामध्ये दिसतो. दलित साहित्यिकांच्या तिसऱ्या पिढीतील आंबेडकरवादी विचारांचा, एक समतातत्वांचा विचार मांडणारा कवी म्हणून लोकनाथ यशवंत हे नाव अवघ्या महाराष्ट्राला परिचित आहे. नागपूर येथील लोकनाथ यशवंत यांचा जन्म १३ मार्च १९५५. त्यांचे आतापर्यंत 'आता होऊन जाऊ द्या'(१९८९), 'आणि शेवटी काय झाले'(१९५५), 'पुन्हा चाल करूया'(२००९) आणि 'बाकी सर्व ठीक आहे'(२०१४) हे कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत.

लोकनाथ यशवंत यांची कविता समाजातील सभोवतालच्या वास्तवातील माणसांच्या वृत्ती-प्रवृत्ती, जातीयता, धर्मांधता, शहरी माणसांचे ढोंगी जगणं, स्वार्थी आपमतलबी जीवन, समाज सुधारकांचा बुरख्याआडचा ढोंगीपणा आदी विषयांना भेदकपणाने भिडताना दिसते. १९९० नंतर जागतिकीकरणाच्या या रेट्यामध्ये माणसाचं जीणं किती पडझडीचे झाले आहे. समाज मनावर झालेले आघात यांचे अत्यंत गंभीरपणाने चित्रित करताना, जे-जे वेदनादायक आहे. जे-जे नाकारायला पाहिजे, जे-जे संताप चीड आणणारे आहे विद्रोह आणणारे आहे, ते सर्व विचारशीलतेने मांडताना कवी लोकनाथ उरबडवेपणा न करता, सामाजिक बांधिलकी जपताना 'माणूस' हाच केंद्रबिंदू ठेवून त्यांनी कविता मांडली त्यांची कविता माणसांचा उन्नयन आणि सम्यक क्रांतीचा विचार मांडते.

भारताला स्वातंत्र्य मिळून आज ७० वर्षे झालीतरी खऱ्या अर्थाने भारत हा जाती, धर्माला चिकटून आहे. 'धर्मनिरपेक्षता' या शब्दाचा अर्थ समजून घेताना धडपड चालू आहे. जात आणि धर्मच श्रेष्ठ मानणारा हा माणूस कधी 'माणूस' बनणार हा प्रश्न कवीने आपल्या अनेक कवितेत मांडत आहेत. मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याच्या चळवळीमध्ये एका दलित तरूण कार्यकर्त्यावर प्रेम करणारी संध्या देशपांडे जेव्हा तो पाणी मागतो तेव्हा 'भिमराव मेश्रामांच्या कविता' या कवितेतील नायकास अस्पृश्यतेचा अनुभव येता

"मी प्यायला पाणी मागतो तेव्हा ती वेगळ्याच ग्लासात पाणी देते.
आणि चटकन धुवायला टाकते."

हेच जातीयतेचे चटके आजही २१ व्या शतकातही अनुभवायला मिळतात. हे सांगताना पिढ्यानुपिढ्या भारतीय समाजाच्या मनातील 'जात' ही नष्ट होत नाही. कितीही उच्चशिक्षण घेतले किंवा कितीही जीवाभावाचे मित्र असतील पण जेव्हा जाती किंवा जातसमूहाचा प्रश्न येतो तेव्हा जो-तो आपल्या जातीपुरता पाहतो, तेव्हा अगदी जीवश्च: कंठश्च: मित्र ही किंवा त्यांची 'यारी' व्हेंटिलेटरवर राहते हे 'पर्यावरण' कवितेत कवी मांडताना म्हणतो,

''मी एकटा प्रिय आहे त्यांना.......
मात्र, समूहात असलो की
आपोआप माझे व्यक्तित्व
होऊन जाते.''

तर 'पर्सनल मुलाखत' ही कविता तर विशिष्ठ जातीच्या लोकांकडे बौद्धीक क्षमता, कौशल्य कितीही प्रभावी असले तरी मुलाखती मध्ये 'जातधर्म' च्या नावावर त्याचे बौद्धिक सक्षमीकरण, त्याची योग्यता मेणबत्तीसारखी वितळून पाण्यापेक्षाही पातळ बनते तर दगडी किल्ला हा एका लाटेत वाळू (मातीमोल) बनतो तर 'जातविरहीत' समाजरचनेचे स्वप्न पहाणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदी महामानवाच्या या देशात २१ व्या शतकात तर कोणकोणत्या जातीचा, ही जाणून घेण्याची कमालीची उत्सुकता आणि जुनाट परंपरावादी, सनातनीवादी प्रवृत्ती 'जीवाचा आटापिटा' या कवितेत लोकनाथ यशवंत मांडताना जात जाणून घेण्यासाठी आडनाव, वस्ती, मुलांची नावे, आरक्षणाचा विषय, धर्म आदी विषयाला हात घालू पाहणाऱ्यांची 'किड्यांसारखी वृत्ती' सांगताना ते म्हणतात,

''शेवटी त्याने जिकरीचा प्रश्न केला,
नोकरी कुठल्या कोट्यात मिळाली, मी म्हणालो - कलावंताच्या''

सगळ्या बाजूने 'जात' शोधणाऱ्याच्या तोंडात कवीने चांगली 'चपराक' मारली आहे.

तसेच कवी लोकनाथ यशवंत यांनी खेड्यातून, ग्रामीण भागातून आलेली संवेदनशील मनाच्या माणसांना शहरात आल्यानंतर 'शहरी' वातावरण, शहरी मानसिकता यांच्याशी जुळवून घ्यावे लागते. नाहीतर एकेदिवशी 'इथून हद्दपार होऊन जाल.... टिनटप्पर' त्यामुळे 'तडजोड' या कवितेतही कवी म्हणतो, शहरी लोकांच्याप्रमाणे शक्तीशाली, लोकांची तळी उचलून, त्यांच्या 'हो' ला 'नाही' ला नाही म्हणून जगावं लागेल जर खेड्यातील दोस्ती, यारी, मैत्री, कळवळा, आपलेपणा, आस्था, आपुलकी या भावना किंवा संवेदना मनाच्या कोपऱ्यात किंवा बासनात गुंडाळून ठेवाव्या लागतात. म्हणून कवी म्हणतो,

''थोडी तडजोड करावीच लागते,
वेळोवेळी मन मारावेच लागते
तरी, सर्व ठीक आहे
यालाच तर इथे आधुनिक जगणे म्हणतात.''

'तरी, सर्व ठीक आहे या ओळीमध्ये अत्यंत मार्मिक, उपहासात्मक तडजोड दिसून येते.'

'एका वृक्षाची गोष्ट' या कवितेत कवीने वृक्षांचा बोन्साय करण्याची प्रवृत्ती आज वाढू लागली आहे. निसर्गाच्या सानिध्यात, खुल्या हवेत, जमिनीत वाढणाऱ्या वृक्षांची 'मूळं' छाटून त्यांची वाढ रोखून स्वतःच्या घराची शोभा वाढवण्याच्या प्रवृत्तीवर कवी प्रकाश टाकताना म्हणतो,

''भविष्यात वृक्ष होणाऱ्या झाडाची
मुळं कापायला मन धजलच नाही''

आणि कवी या प्रवृत्तीला विरोध करून तो बोन्साय केलेला पिंपळ जमिनीत लावतो आणि त्याचे अस्तित्व त्याला बहाल करतो. तसेच काही लोकांच्या मूर्खपणाचा कळस मांडताना कवी सुभाषिताप्रमाणे थेट, भाष्य करताना चारोळीप्रमाणे आपले विचार व्यक्त करताना म्हणतो,

''खूप लोक खूपच मुर्ख असतात
सकाळी-सकाळी झाडांची सुरेख फुले तोडून
वाहतात दगडी मूर्तींना''

म्हणजे वृक्ष हे आपले सगेसोयरे असतात. मित्र असतात पण आपण त्या वृक्षांवर घाला घालतो त्यांच्यावर कुऱ्हाड चालवतो पण माणसाला कळत नाही तो स्वतःच्याच पायावर ही कुऱ्हाड मारून घेत असतो.

तर कवी लोकनाथ यशवंत 'राग', 'सोन्याचा दात', 'स्पर्श' या कवितेतून कुपोषित बालकांचा प्रश्न, लाचार होऊन वेश्या व्यवसाय करण्याच्या स्त्रीयांचा प्रश्न तर अनाथ मुलांचा प्रश्न यावर भेदकपणाने प्रकाश टाकतात - 'स्पर्श' कवितेत कवी श्रीमंतीने माजलेले लोक कुत्र्यासाठी बकऱ्यांची मुंडी, त्यांना रंगीबेरंगी कपडे यांची रेलचेल पण 'अनाथ' मुलांचे आधार बनायला कुणी तयार होत नाही म्हणजे माणसांपेक्षा पशुंना आपले मानणारा ही माजलेली प्रवृत्ती तर मरणाच्या दारात कुपोषित बालके, विवश झालेल्या वेश्या, तर एकीकडे दहशतीखाली वावरणारा मजूर, कामगार, शेतकरी ही सगळी 'ग्लोबल बेकारी' याचा विचार कवीच्या लहान मेंदूला महाताप देतात कारण समाजात आज एवढी बकाल अवस्था असताना भांडवलदार, राजकारणी, सत्तापिपासू लोक मात्र हातात सोन्याच्या अंगठ्या, सोन्याचे दात लावून श्रीमंतीचे प्रदर्शन करतात.

हे सर्व बदलणार नसेल तर भारत महासत्ता, बलशाली बनणार हे स्वप्न उद्‌ध्वस्त व्हायला वेळ लागणार नाही ही खंत कवीने व्यक्त केली आहे.

कवी लोकनाथ यशवंत यांनी 'लीडर' या कवितेत आजकालच्या चळवळीचे, आंदोलनाचे 'नेभळटपण' कसे आहे यावर आक्षेप घेताना माणसाच्या पलायनप्रवृत्तीची कठोर ओळख करून दिली आहे. स्वतःला 'लीडर' म्हणणारा नेता विविध मागणीसाठी मोर्चा काढतो. सोबत असंख्य कार्यकर्ते. नेता पुढे कार्यकर्ते मागे पण एका क्षणी मोर्चाचे संतुलन बिघडते, समोर शस्त्रधारी पोलीस पाहून 'नायक' सावध होतो आणि अटीतटीच्या वेळी मोर्चातून पळ काढतो. या पलायनवृत्तीवर 'रस्त्यावरील एका छक्क्याने आम्हाला गांडू म्हटले.' म्हणजे या ओळीतून कवीला असे सूचवायचे आहे, रस्त्यावरील तृतीयपंथीयाने आपल्याला नेभळट म्हणावे यासारखे 'अपयश' नाही. काहीवेळा आज वर्तमानकाळात आपल्याला अनेक आंदोलन, चळवळीचे नेते पळ काढून माघार घेताना दिसतात. या प्रवृत्तीचा निषेध करणारा हा कवी समाजाची आत्मभानाची जाणीव किती बोथट झाली आहे हे दर्शित करतो.

तर या जागतिकीकरणात आज फक्त काहीच लोकांना काही गोष्टींचा त्याचा लाभ होतो तर बहुसंख्य लोक हे पाठीमागे राहतात. कोणतेही नवे तंत्रज्ञान आले तर पुढचे

लाभार्थी मागचे निरर्थक त्यामुळे जागतिकीकरणाच्या या रेट्यामध्ये विकासाची गंगा शेवटच्या माणसापर्यंत पोहचवू असे किती राज्यकर्ते म्हणत असले तरी त्याचा लाभ शेवटापर्यंत जात नाही. पण प्राप्त परिस्थितीत मागे राहणाऱ्या माणसाने काय केले पाहिजे, यासाठी 'शेवटचा माणूस आणि वेळेचा तगादा' या कवितेत शेवटच्या माणसाला स्वत: स्वत:चा आधार बन, हे सांगताना कवी म्हणतो,

''तुझे आशाळभूत डोळे बदलवून घे
जीवनाच्या या हरामखोर वेगात
सर्व धावताहेत तप्त उजेडाकडे
तुझे प्रश्न, तुझ्या समस्या तुझ्यासोबत
मागे ठेवलेल्यांशी आता कुणाचे काहीच नाही''

म्हणजे आज प्रत्येकाच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे आणि स्वअस्तित्वासाठी 'स्व' नेच धडपडायला पाहिजे म्हणजे जागतिकीकरणामध्ये व्यक्तिवाद किंवा वस्तूवाद बोकाळलेला दिसून येतो.

**समारोप :**

थोडक्यात कवी लोकनाथ यशवंत हे आपल्या अनेक कवितेमध्ये आजच्या बदलत्या वर्तमानावर भाष्य करताना दिसतात. त्यामुळे समकालाचे वास्तव भान ठेवून मांडणारा हा कवी. त्यामुळे त्यांची कविता सर्वसामान्य माणसाला आपली वाटते. तसेच वाचकाला अंतर्मुख करते. अशा समकालीन वास्तवाचे दर्शन घडविणारे कवी लोकनाथ यशवंत मराठी कवितेचे दालन अधिक समृद्ध करतात हे निश्चित!

**संदर्भ :**

१. लोकनाथ यशवंत – *'आता होऊन जाऊ द्या', सुषमा रामपुरे, चंद्रपूर, प्र.आ.१९८९.*
२. लोकनाथ यशवंत – *'बाकी सर्व ठीक आहे', समुद्र प्रकाशन, नागपूर (२०१४)*
३. कांबळे उत्तम – *'जागतिकीकरणात मराठी कविता', परचुरे प्रकाशन, मुंबई, प्र.आ.२००९.*
४. सुनील चंदनशिवे – *'मराठी दलित कविता एक चिकित्सक अभ्यास', डिंपल पब्लिकेशन, प्र.आ.२००५.*
५. लोकसत्ता – *बहिर्लक्षी भाष्य कविता – दि.३/९/२०१६.*